अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २८ डिसेंबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ७९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## सरकारने गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही; मनोज जरांगेंचा इशारा

**मुंबई** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २० जानेवारीला मुंबईकडे निघणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली आहे. तर, सरकारने आम्हाला मारहाण केली किंवा गोळ्या घातल्या तरीही आता थांबणार नाही असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. याच रुग्णालयात त्यांनी आज पत्रकार परिषद घेत सरकारला थेट इशारा दिला आहे. यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, आम्हाला मुंबईला जायची हौस नाही. आमच्या मुलांचे पुढील काळात खूप वाटोळं होणार आहे, त्यामुळे त्यांना आम्हाला आरक्षण द्यायचं आहे. हीच आमच्या गोरगरीब मराठ्यांची भूमिका असून, त्यावर आम्ही ठाम आहे. आता शेवटचं सांगतो, मुंग्यासारखे मराठे घराच्या बाहेर पडणार आहे. सरकारने



मारहाण केली केली किंवा गोळ्या घातल्या तरीही आरक्षणाच्या मागणीवरून मागे हटणार नाही. ज्याज्या वेळी मी बोलतो, त्या-त्यावेळी ते करतो. आता मुंबईला गेल्यावर माघार घेणार नाही. संपूर्ण शक्ती पणाला लावण्याची माझी तयारी आहे. वेळप्रसंगी जीव देखील द्यायची तयारी आहे. मात्र, आता आरक्षण घेतल्याशिवाय आम्ही गोरगरीब मराठे मागे हटणार नाही असे जरांगे म्हणाले.

# माळ्याच्या तिळ्यावरून बावनकुळे उसळले

## ‘मतभेद’ आहेत पण ‘मनभेद’ नाही

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बाबनकुळे हे दोन दिवसांच्या सोलापूर दौऱ्यावर आले आहेत. बुधवारी त्यांनी माढा लोकसभा मतदार संघाचा दौरा केला.पक्षाच्या कामकाजाचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी पंढरपूरमध्ये पत्रकार परिषद घेतली.त्यावेळी पत्रकारांनी माढा लोकसभा मतदार संघात खा.रणजितसिंह निंबाळकर आणि मोहिते पाटील यांच्यात उमेदवारी मिळवण्यावरून सुरू असलेल्या संघर्षाचा प्रश्न उपस्थित केला, त्यावेळी बावनकुळे हे एकदम उसळले. पक्षाकडून ज्याला उमेदवारी मिळेल, त्याच्या मागे सर्वांना उभे रहावेच लागेल. कुणी बॅनर लावले म्हणून काही होत नाही, अशा शब्दात त्यांनी तिकिट मिळवण्यासाठी बाशिंग बांधून बसलेल्यांना कानपिचक्या दिल्या शिवाय निंबाळकर आणि मोहिते–पाटील यांच्यात मतभेद असले तरी मनभेद नाहीत.वाद मिटतील, असे सांगून त्यांनी सावध भूमिकाही घेतली.**

मोहिते पाटील व आम्ही एकत्र आहोत. मोहिते पाटील हे जरी हे जरी वेगळी भूमिका मांडून तिकिट मागत असले तरी आम्ही त्याचा विचार करू. मोहिते पाटील आणि आणि खासदार निंबाळकर यांच्यात कुठलेही मतभेद नाहीत. जरी असले तरी आम्ही ते मिटवून टाकू. मोहिते पाटील आणि खासदार आम्ही एकाच मीटिंगमध्ये तीन तास चर्चा केलेली आहे. मतभेद मिटतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. माढा लोकसभा मतदारसंघात रणजितसिंह निंबाळकर विरुद्ध मोहिते पाटील वादात भाजपकडून कुणाला उमेदवारी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बावनकुळे यांनी माढा लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर आल्यानंतर खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि मोहिते पाटील कुटुंबीयांची भेट घेतली. या दोन नेत्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुप्त संघर्ष सुरू आहे. त्यामुळे भाजपच्या अंतर्गत राजकारणाचा फायदा विरोधकांना मिळू नये यासाठी बावनकुळेंनी हा दौरा केल्याची चर्चा आहे.



### निंबाळकरांना ग्रीन सिग्नल

भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी लोकसभेच्या उमेदवारीसाठी ग्रीन सिग्नल दिल्याची चर्चा आहे. निंबाळकरांचे कौतुक करताना बावनकुळे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सर्वात अधिक निधी देऊन निंबाळकरांवर विशेष प्रेम दाखवले. देशातील टॉप १० मध्ये खासदारांमध्ये निंबाळकर यांचा समावेश आहे.

### स्वानुभव सांगितला...

पक्षाने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बावनकुळे यांना आमदारकीचे तिकिट दिले नव्हते. मात्र, मी पक्षाचा आदेश मानत १५ वर्षे आमदार, ऊर्जामंत्री म्हणून चांगले काम केले. पक्षाने मला लढू नका म्हणून सांगितले, असे म्हणत बावनकुळे यांनी आमदार–खासदारांना इशाराच दिला आहे.

### धैर्यशील मोहिते पाटलांचा दावा; नेते निंबाळकरांच्या पाठिशी

माढा लोकसभा मतदारसंघावर धैर्यशील मोहिते पाटील यांनी दावा केल्याने भाजपसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. मोहिते पाटील यांची माढा लोकसभा मतदारसंघात मोठी ताकद असून मोहिते पाटील यांच्या भाजप प्रवेशानंतर माढा लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादीकडून भाजपाला जिंकता आला होता. मात्र सध्याच्या परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील माढा येथील आमदार बबनदादा शिंदे, करमाळ्याचे आमदार संजयमामा शिंदे, सांगोल्याचे शिंदे सेनेचे आमदार शहाजीबापू पाटील आणि माण खटावचे भाजप आमदार जयकुमार गोरे यांनी आपले वजन विद्यमान खासदार रणजित निंबाळकर यांच्या पारड्यात टाकल्याचे चित्र आहे.

### सबुरीचा सल्ला

आपल्या पहिल्याच टर्ममध्ये खासदार रणजित निंबाळकर यांनी माढा लोकसभा मतदारसंघातील बहुतांश तालुक्यातील पाण्याचे, रस्त्याचे प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघात निंबाळकर यांचा मोठा बोलबाला असल्याची चर्चा आहे. निवडणुकीचा जवळ येत आहेत तसतसे पक्षाच्या तिकीट आपल्यालाच मिळणार, असा दावा राजकीय नेत्यांकडून करण्यात येतोय. मात्र, आपला अनुभव सांगत इच्छुकांना सबुरीचा सल्लाच बावनकुळे यांनी दिलाय. तिकिट वाटप हे केंद्रीय समिती करते त्यामुळे भाजपमध्ये केव्हाही कोणाला तिकिट देऊ शकतो आणि थांबवू शकतो, असे बावनकुळे म्हणाले.

## खंडणीसाठी मारहाण करुन ठेकेदाराच्या खिशातील पैसे घेतले

**कोर्सेगाव येथील घटना**

**सुराज्य/सोलापूर**

बांधकामाचे टिप्पर अडवून खंडणीसाठी ठेकेदाराच्या सहकाऱ्यात मारहाण करून त्यांचा खिशातील पैसे लुटून नेल्याची घटना कोर्सेगाव (अक्कलकोट) येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी शिवानंद टेंगळे (कोर्सेगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात प्रदीप शिवानंद पाटील (हत्तरसंग कुडल) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी शिवानंद टेंगळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रदीप पाटील यांचे कोर्सेगाव ते मुंडेवाडी रोडवरील रस्ता दुरुस्तीचे काम चालू आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास तीन टिप्परमधून त्या ठिकाणी डांबर नेण्यात येत होते.




त्यावेळी शिवानंद टेंगळे हा गावाजवळ टिप्पर अडवून ड्रायव्हला पुढे जाण्यासाठी २० हजारांची खंडणी मागितली. ड्रायव्हरने आमच्याकडे पैसे नाहीत, असे म्हणून पाटील यांना फोन केले. पाटील घटनास्थळी आले असता त्यांच्यासोबत असलेल्या भीमाशंकर बिराजदारला आरोपीने चापट मारली. पाटील यांच्या खिशातील ७ हजार रुपये काढून घेतले. तुम्हाला फार मस्ती आली. आमच्या भागात पुन्हा दिसला तर जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी देखील त्याने दिली. फौजदार धायगुडे तपास करीत आहेत.

## जयहिंद फॅक्टरीत कामगाराची गळफासाने आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर**

कारखान्यात ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या एका ५४ वर्षीय कामगाराने गळफास घेऊन आत्महत्या केली.



ही घटना आचेगाव (दक्षिण सोलापूर) येथील जय हिंद साखर कारखान्यात बुधवारी दुपारच्या सुमारास घडली.

परशुराम चपतराव आडगिरे (वय-५४, चिंचोली, हिंगोली, सध्या रा.कारखाना) असे मयताचे नाव आहे. बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह कारखान्याच्या पत्राशेडमध्ये काथ्याच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडवून कामगारांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

मयत परशुराम हा एकटाच कारखान्यात राहून जड वाहनावर ड्रायव्हरचे काम करीत होता. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून, या मागचे कारण समजले नाही.

## शिर्डीला जाणाऱ्या कारला कंटेनरची धडक

## कर्नाटकातील चार भाविकांचा मृत्यू

**सोलापूर** : करमाळा-नगर मार्गावर पांडे गावाजवळ शिर्डीला निघालेल्या कारला कंटेनरने जोरदार धडक दिली. त्यामुळे झालेल्या भीषण अपघातात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर सहाजण गंभीर जखमी आहेत.

ही घटना बुधवारी पहाटे घडली. अपघात होताच, घटनास्थळी गावकऱ्यांनी धाव घेत बचावकार्य केले. पोलिसही तत्काळ घटनास्थळावर पोहचले होते. सहा जखमींवर जवळील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कर्नाटकातील कलबुर्गी येथील भाविक साईच्या दर्शनासाठी निघाले होते. करमाळा तालुक्यातील सालसेकडून तवेरा गाडीने (के. ए. ३२ - एन. ०६३१) शिर्डी येथे दर्शनासाठी निघाले होते. कंटेनर (आर. जे. ०६ जी. सी. २४८६) हा फरशी घेऊन करमाळ्याकडून सालसेच्या दिशेने निघाला होता. पहाटे पावने सहा ते सहाच्या सुमारास पांडे गावच्या पुलाजवळील वळणावर या गाड्यांची समोरासमोर धडक झाली. अपघातानंतर कंटेनर चालक फरार झाला.तवेरा गाडी रस्त्याच्या खाली उपडी पडली.



तवेरा आणि कंटेनरची समोरासमोर धडक झाल्याने जोरात आवाज झाला. अपघाताचा आवाज येताच पांडे गावातील युवकांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर चारचाकी एका अंगावर करुन जखमींना बाहेर काढले. प्रसंगावधान राखून या युवकांनी रुग्णवाहिका आणि पोलिसांना पाचारण करुन मदतकार्य सुरु ठेवले. अपघातात श्रीशैल चंदेशा कुंभार (वय-५६), शशिकला श्रीशैल कुंभार (वय-५०, कलबुर्गी), ज्योती दिपक हिरेमठ (वय-३८, बागलकोट) यांचा जागीच मृत्यू झाला. शारदा दिपक हिरेमठ (वय-७०, हुबळी) यांना करमाळा उपजिल्हा रुग्णालयात मृत घोषित केले.

हा अपघात एवढा भीषण होता की, अपघातातील कार कंटेनरला धडकून रस्त्यापासून खाली जाऊन उलटून पडली. गाडीचा चक्काचूर झाला. अपघाताची माहिती समजताच करमाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना करमाळा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. अपघातातील कार ही गुलबर्ग्याहून पांडे मार्गे शिर्डीला देवदर्शनासाठी जात असल्याचे सांगितले जाते. पांडे गावाजवळ आल्यानंतर त्यांच्या कारचा अपघात झाला. यामध्ये नवरदेव- नवरी असल्याचेही सांगितले जात आहे. अपघाताचे कारण नेमके समजलेले नसून जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**सदर अपघातात गाडी ड्रायव्हर श्रीकांत राजकुमार चव्हाण (वय २०, कलबुर्गी) हा किरकोळ जखमी झाला. केवळ आठ महिन्यांचा चिमुकला सुखरुप बचावला आहे. इतर जखमींवर उपचार सुरु आहेत.**

## काश्मीरमधील ’या’ संघटनेवर केंद्र सरकारकडून बंदी

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. मुस्लीम लीग जम्मू-काश्मीर मसरत आलम या संघटनेवर बंदी घातली आहे. ही कारवाई बेकायदेशीर कृत्य प्रतिबंध कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांमध्ये या संघटनेचा सहभाग असल्याचे समोर आले. त्याशिवाय, दहशतवादी गटांना या संघटनेकडून पाठिंबा दिला जात होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ट्विटरवर कारवाईची माहिती दिली.

## बार्शी बस स्थानकात दोन महिलांच्या गळ्यातील सव्वा लाखांचे दागिने लुटले

**सोलापूर** : बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेत दोघा महिलांना धक्काबुक्की करीत दोन महिलांनी सव्वा लाखाचे दागिने लुटून पोबारा केला. ही जबरी चोरीची घटना बार्शी बस स्थानकात घडली. या प्रकरणी बार्शी शहरच्या पोलिसांनी दोघा अनोळखी महिला विरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात मायादेवी प्रदीप पाटील (पारडी, धाराशिव) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याला सोमवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास बार्शी बस स्थानक ते परंडा या बसमध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी दोघाअनोळखी महिलांनी सुनिता बबनराव आगळे यांना धक्काबुक्की करीत त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅमची तर आगळे यांच्या गळ्यातील १८ ग्रॅमचे गंठण हिसका मारून तोडून नेले. अशी नोंद पोलिसात झाली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्या भाऊबंदकीला आवरलं पाहिजे !

| कल्याण |
|---|
| 589-24-455 |


| मुंबई |
|---|
| 489-19-234 |

# पश्चिम महाराष्ट्रात २० हजार ग्राहकांची वीज खंडित

- सोलापूर जिह्यातील सहा हजार ग्राहकांचा समावेश
- २ लाख ५३ हजार ग्राहकांकडे ४९ कोटी ६ लाखांची थकबाकी

**सुराज्य/सोलापूर**

वारंवार आवाहन करूनही वीजबिलांचा भरणा न केल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीतील १५ लाख ७४ हजार ५८० वीजग्राहकांकडे ३१० कोटी १७ लाख रुपयांची थकबाकी झाली आहे. महावितरणकडून वसूली मोहिमेला वेग देण्यात आला आहे. थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत पश्चिम महाराष्ट्रात २० हजार ग्राहकांची वीज खंडित करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यतील यामध्ये सहा हजार ग्राहकांचा समावेश आहे. तर सोलापूर जिल्ह्यातील दोन लाख ५३ हजार ग्राहकांकडे ४९ कोटी ६ लाखांची थकबाकी आहे.



थकबाकी मध्ये घरगुती १३ लाख ९८ हजार ४४९ ग्राहकांकडे २१८ कोटी ३० लाख तसेच वाणिज्यिक १ लाख ५२ हजार ९०० ग्राहकांकडे ६२ कोटी ९ लाख तर औद्योगिक २३ हजार २३१ ग्राहकांकडे २९ कोटी ७८ लाख रुपयांची थकबाकी आहे.

वीजबिलांच्या थकबाकीमुळे गेल्या २५ दिवसांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक २० हजार ३२८ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये पुणे जिल्हा (११ हजार १८२), सातारा (१ हजार ८२८), सोलापूर (६ हजार ८), कोल्हापूर २ हजार ९४) आणि सांगली जिल्ह्यातील २ हजार ७७६ थकबाकीदारांचा समावेश आहे. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील वीजग्राहकांना चालू व थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयींचे व्हावे यासाठी महावितरणचे अधिकृत वीजबिल भरणा केंद्र शनिवारी ३० व रविवारी ३१ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरू ठेवण्यात आली.

### जिल्हानिहाय थकबाकी, ग्राहक

पुणे जिल्हातील १९८ कोटी ३ लाख रुपये (७ लाख ७६ हजार ४९८), सातारा जिल्हातील २२ कोटी २ लाख (१ लाख ८६ हजार ४७९), सोलापूर जिल्हा ४९ कोटी ६ लाख (२ लाख ५३ हजार ९३९), कोल्हापूर जिल्हा २० कोटी ३३ लाख (१ लाख ७७ हजार ९३८) आणि सांगली जिल्ह्यात २० कोटी ७३ लाख रुपयांची (१ लाख ७९ हजार ७२६) थकबाकी आहे.

वीजबिलांचा नियमित भरणा होत नसल्याने महावितरणची आर्थिक कसरत सुरू आहे. त्यामुळे वीजग्राहकांनी चालू व थकीत बिलांचा भरणा करून सहकार्य करावे अन्यथा कारवाई केली जाईल.

**– अंकुश नाळे**
(प्रादेशिक संचालक)